# भारतीय डाक विभाग

## प्रवर अधीक्षक डाकघर, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय 416003

## Walk In Interview (थेट मुलाखत)

टपाल जीवन विमा व ग्रामीण टपाल जीवन विमा योजनेअंतर्गत विविध विमा योजनांच्या विक्रीसाठी **मा. प्रवर अधीक्षक डाकघर,** कोल्हापूर विभाग कोल्हापूर 416003 यांचे मार्फत थेट मुलाखतीद्वारे विमा प्रतिनिधींची नेमणूक (कमिशन तत्त्वावर) करण्यात येणार आहे. खालील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज, आधार कार्ड, पॅन कार्ड, जन्मतारखेचा पुरावा, शैक्षणिक प्रमाणपत्र, फोटो व अन्य संबंधित दस्तावेज सोबत जोडून मा. प्रवर अधीक्षक डाकघर, रमणमळा, कोल्हापूर, 416003 येथे **दि. 20 जुन 2024 पूर्वी प्रत्यक्ष अथवा टपालाद्वारे जमा करावेत.**

**१) पात्रतेच्या अटी :**

**अ) वय मर्यादा :** उमेदवाराचे वय 18 वर्षे पूर्ण असावे. **ब) शैक्षणिक पात्रता :** उमेदवार 10 वी पास / मान्यताप्राप्त मंडळाद्वारे समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा. **क) अनुभव :** इच्छुक उमेदवारास विमा पॉलिसी विक्रीचा अनुभव (Marketing Skill), संगणकाचे ज्ञान व स्थानिक भागाची पूर्णतः माहिती असावी. **ड)** बेरोजगार तरुण / तरुणी, स्वयंरोजगार करणारे पुरुष व महिला, कोणत्याही कंपनीचे माजी विमा प्रतिनिधी, माजी जीवन विमा सल्लागार, अंगणवाडी कर्मचारी, महिला मंडळ कर्मचारी, माजी सैनिक, ग्रामपंचायत सदस्य, स्वयंसेवी संघटना चालक, कर सल्लागार किंवा वरील पात्रता असणारे सर्व इच्छुक उमेदवार अर्ज करू शकतात.

वरील अटी पूर्तता करणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वतंत्र तारीख टपालाद्वारे कळविणेत येईल. विमा प्रतिनिधींच्या निवडीबाबतचे आणि थेट मुलाखतीबाबतचे सर्व अधिकार **प्रवर अधीक्षक डाकघर,** कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे राखीव आहेत. **अधिक माहितीसाठी नजीकच्या पोस्ट ऑफिसशी संपर्क साधावा.**

सही/- **प्रवर अधीक्षक डाकघर,**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर 416003**

mahasarkarinaukri